**मराठी विज्ञान परिषदेचे कार्य** (www.mngogate.com) लेख M15 update 20 Feb 2009 (**मूळ टिप्पण** 1 मे 2004) ***काही बदल*** *तिरप्या अक्षरात 1 जून 2007 (क्र 09 मध्ये 20 फेब्रु 2009).* महाराष्ट्र साहित्य परिषद व मराठी अभ्यास परिषद यानी मराठी भाषेचा विकास यावर चर्चेसाठी काही संस्थांना निमंत्रित केले. मराठी विज्ञान परिषदेने मला प्रतिनिधी नेमले. त्यावेळी वाचलेले टिप्पण.

01. संस्थेचे स्वरूप प्रथम संयोजकांचे आभार. मराठीप्रेमी, विज्ञानप्रेमी लोकांची मराठी विज्ञान परिषद ही एक प्रातिनिधिक संस्था आहे. 1966 मध्ये ती स्थापन झाली तेव्हापासून मी एक कार्यकर्ता आहे. मुख्य कार्यालय मुंबईत असून पुण्यात शाखा आहे. ठिकठिकाणी तिचे सुमारे 60 संलग्न विभाग (चॅप्टर) आहेत. मराठीतून विज्ञानप्रसार करणे, त्यासाठी मराठी भाषा संपन्न करणे हे मुख्य उद्देश आहेत. *मराठी विज्ञान परिषद पुणे विभाग एप्रिल 2007 पासून संलग्न झाल्यामुळे शाखा मे 2007 अखेर बंद. मुख्य कार्यालय व विभाग यांचे सहकार्य असते. सर्व विभाग विविध प्रकारे विज्ञानप्रसार करतात.*

02. संस्थेचा फोकस  उपलब्ध साधनसंपत्ती, कार्यकर्त्यांचा अनुभव लक्षात घेऊन कामाची निवड होत असते. निसर्गविज्ञान व समाजविज्ञान या विज्ञानाच्या दोन शाखा आहेत. समाजविज्ञानाकडे परिषदेचे कमी लक्ष आहे. विज्ञानात तंत्रज्ञान घेतले जाते. विज्ञानप्रसाराने अंधश्रद्धा कमी होतील व वैज्ञानिक दृष्टिकोन वाढेल. पण ठोस कार्यक्रम म्हणून परिषद बुवाबाजीविरुद्ध किंवा गुटखाविरोधी आंदोलने करत नाही. अ‍ॅलोपथी व आयुर्वेद यापैकी खरे विज्ञान कोणते, अशा वादात परिषद बाजू घेत नाही.

03. वैज्ञानिक संशोधन हाही संस्थेचा उद्देश असला तरी संस्थेकडे सुसज्ज प्रयोगशाळा नाहीत. उद्देश अजिबात डावलला, असे मात्र नाही. काही नद्यांचे सर्वेक्षण करण्याचे काम विद्यार्थ्यांनी मराठीतून केले. गणपती दूधप्राशन प्रकरणी तसे होऊ शकत नाही याचे प्रयोग तज्ज्ञांकरवी करून दाखवले.

04. प्रमाणलेखन परिषदेने मराठी साहित्य महामंडळाचे शुद्धलेखन नियम घेतले आहेत. पण काही वेगळेपणाही आहे. परिषदेच्या प्रकाशनात देवनागरी अंकांऐवजी (टेलिफोन तबकडीवरचे) जागतिक अंक वापरले जातात. पर्वत या शब्दाप्रमाणे मीटरचे अनेकवचन मीटर हेच हवे, पण बरेचदा ते इंग्रजीनुसार मीटर्स असे केले जाते. लाख कोटी ऐवजी दशलक्ष, मिलीयन ही योजना कधीकधी होते.

05. मान्यवर संस्थांशी सहकार्य काही मराठी कार्यक्रम अन्य संस्थांबरोबर होतात. उदा. इंस्टिट्यूशन ऑफ इंजीनिअर्स, महाराष्ट्र साहित्य परिषद, लोकमान्य सेवा संघ, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान.

06. काही निरुपाय अधिकृत प्रकाशनांबाबतीत संपादक जागरूक धोरण ठेवतात, शब्दांमध्ये फेरफार करतात. पण काही बाबतीत निरुपाय असतो. उदा. सवयीमुळे काही विभागसंस्था देवनागरी अंक वापरतात. व्याख्यात्यानी गोषवारा द्यावा असे सुचवले जाते. बरेचदा ऐनवेळी व्याख्याते काही प्रती आणतात. त्यात भाषेच्या काही चुका असल्या तरी पत्रकारांना प्रतींचे वाटप केले जाते. मराठी भाषणात जरूर ते इंग्रजी शब्द व इंग्रजी पारदर्शिका यांची सवलत दिली जाते.

(पुढे चालू)

07. परिभाषा, सूची व कोश  भाषा संचालनालय, विविध विद्यापीठे व मराठी विज्ञान परिषद यांच्या समित्यानी विविध विषयांच्या परिभाषा ठरवल्या. पण योग्य उपयोग झाला नाही. उदा. 5 ते 7 इयत्ता आणि 8 ते 10 इयत्ता यांच्या पुस्तकात वेगवेगळी परिभाषा आहे. राज्य मराठी विकास संस्थेशी परिषदेचे सहकार्य असून 1951 ते 2000 मराठी विज्ञान पुस्तकांची सूची प्रसिद्ध झाली. विद्यार्थ्यांसाठी तीनशे मराठी संकल्पनाचा सचित्र कोश प्रकाशनाच्या वाटेवर आहे.  *(संकल्पनाकोश प्रसिद्ध झाला)*

08. ललितसाहित्यात भर 1970 पासून विज्ञानकथास्पर्धा घेतली जाते. कथांचे परीक्षण एक वैज्ञानिक व एक साहित्यिक करतात. हा कथाप्रकार मराठी साहित्यात रूढ करण्यात परिषदेचे योगदान आहे. आज आघाडीवर असलेल्या काही विज्ञानकथा लेखकांचे या क्षेत्रात पदार्पण या स्पर्धांतून झाले. निवडक कथांचा संग्रह विज्ञानिनी नावे प्रसिद्ध झाला. कथालेखनाबाबत तज्ञांची काही भाषणे ठेवली.

09. वार्षिक मराठी विज्ञान संमेलन संमेलनात विज्ञानप्रसारक एकत्र येतात, परिचय होतात, विचारांची देवघेव होते, काहींचे सन्मान होतात, प्रदर्शने असतात, विद्यार्थ्यांसाठी काही कार्य होते. कित्येक तज्ञ व्याख्याने देतात. संमेलनाध्यक्षांची भाषणे ही मोठी वैचारिक मेजवानी असते, त्यांचे पडसाद वृत्तपत्रात पडतात. आतापर्यंत 38 संमेलने झाली, त्यातील भाषणांचे 2 खंड प्रसिद्ध होतील. *(20 फेब्रु 2009 पर्यंत 43 संमेलने ऑक्टो नोव्हें डिसें मध्ये. क्र 39 पासून संमेलन ऐवजी अधिवेशन नाव आले. क्र 01 ते 38 अध्यक्षीय भाषणे खंड प्रसिद्ध झाला. चौकशी  मविप मुख्यकार्यालय. mavipa.mumbai@gmail.com )*

10. मराठी विज्ञान परिषद पत्रिका हे 32 पानी मासिक उत्तम कार्य करित आहे. तहेलका, तेलगी, कल्पना चावलाचा मृत्यू अशी प्रकरणे झाली तेव्हा त्यावर अभ्यासपूर्ण वैज्ञानिक माहितीचे तज्ञांचे लेख पत्रिकेत आले. वेळोवेळी विशेषांक निघाले. कित्येक नियतकालिकांनी लेखांचे पुनर्मुद्रण केले.

11. अन्य उपक्रम सौर शेगडी, ध्वनीप्रदूषण अशा विषयांवर स्वस्त पुस्तिका, निबंधस्पर्धा, गच्चीवरील बगीचांची प्रात्यक्षिके, ग्रहतारे यांची निरीक्षणे, मुलगा वयात येतो - मुलगी वयात येते, एड्स् यांवर स्लाईडशो असे नानाविध प्रकारे मराठीतून विज्ञानप्रसार करण्याचे परिषदेचे कार्य आहे. हजारो मुलांमुलींनी हे स्लाईडशो पाहिले आहेत, विविध शाळांच्या सहकार्याने व झोपडपट्टीत हे कार्य होते.

12. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कार्य सभासद, तज्ञ, शासन, देणगीदार, प्रसारमाध्यमे यांच्या सहकार्याने परिषद वाढली. अन्यभाषिक विज्ञानप्रसारक संस्थांशी सहकार्य आहे. त्यांद्वारा देश-विदेश पातळीवर इंग्रजीत चर्चासत्रे झाली. त्यातून मराठीतील काही विज्ञानकार्य अन्य भाषेत व उलट दिशेने येण्यास चालना मिळाली. इंडियन सायन्स कॉंग्रेस पुण्यात भरली तेव्हा देशीविदेशी प्रतिनिधींसाठी स्मरणिकेत परिषदेवर इंग्रजीत लेख होता. 600 चौरस मीटर इमारत, 16 कर्मचारी, वार्षिक रु. 50 लाख बजेट व्याप आहे. (पत्ता - विज्ञान भवन, पुरव मार्ग, मुंबई 400022 मंगळवार रजा. फोन 022-24054714)
*विज्ञानभवनामुळे परिषदेची प्रतिष्ठा वाढली. नवनवीन उपक्रम करणे शक्य झाले. अवश्य भेट द्यावी.*

-- **म. ना. गोगटे**    लेखक संपर्क वेबसाईटवर इंडेक्स पानावर.